# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## परिपत्रक २०१६-१७

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील एम.फिल. नियमित अभ्यासक्रमाच्या प्रवेशसंबंधीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एम. फिल. अभ्यासक्रम | रिक्त जागा | प्रवेश अर्ज भरण्याची तारीख | प्रवेश परीक्षाची तारीख/वार |
|---|---|---|---|---|
| १. | भूशास्त्र, | ०२ | १२.०८.२०१६ ते २३.०८.२०१६ | ३०.८.२०१६ (मंगळवार) |
| २. | मराठी, | ०४ | | |
| ३. | शिक्षणशास्त्र, | ११ | | |
| ४. | रसायनशास्त्र | ०१ | | |
| ५. | ए.आय.एच.सी ॲण्ड ए. | ०१ | | |

१. प्रवेश व सिनॉप्सिस अर्जासह एम.फिल. माहितीपत्रकाची विद्यापीठ कार्यालयामध्ये रोखीने किंमत रुपये १००/- इतकी आहे.

२. प्रवेश अर्जासोबत एम.फिल. नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांने प्रवेश परीक्षा शुल्क रुपये ३००/- भरणे आवश्यक आहे.

३. नियमित एम.फिल. प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा लेखी व मौखिक उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४. प्रवेश परीक्षेसंबंधीची तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संबंधित संकुलप्रमुख/केंद्रप्रमुखाशी संपर्क साधून घ्यावयाची आहे.

५. नियमित सर्व विषयांच्या प्रवेश परीक्षा फक्त संबंधित अधिविभागामध्ये होतील.

६. लेखी परीक्षा सामान्यत: विषयाचे पदव्युत्तर स्तरावरील ज्ञान व संशोधन प्रवृत्ती या संबंधात असेल.

७. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय दिलेला कोणताही प्रवेश मान्य होणार नाही. नियमाबाहय प्रवेश देणारे महाविद्यालय होणा-या परिणामांना जबाबदार राहतील.

८. प्रत्येक मान्यताप्राप्त मार्गदर्शकाकडे UGC Regulation (M.Phil/Ph.D.) २०१६ प्रमाणे विद्यार्थी प्रवेशीत करण्यात येतील.

९. एम.फिल. अभ्यासक्रम शिकविण्यासाठी व शोधप्रबंधास मार्गदर्शन करण्यासाठी मान्यता नसलेल्या शिक्षकाकडे दिलेला प्रवेश मान्य होणार नाहीत. आणि अशा प्रकरणी आलेले शोधप्रबंध सादर करून घेतले जाणार नाहीत. त्याबाबत कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

१०. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येकी सात प्रती आराखडा अर्जासह दिनांक ३० ऑक्टोंबर २०१६ पूर्वी भरले पाहिजेत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रत्येकी सात प्रती आराखडा अर्जासह प्राचार्यानी विद्यापीठ कार्यालयाकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३० ऑक्टोंबर २०१६ पर्यंतच पाठविणे बंधनकारक आहे. त्यानंतर येणा-या आराखडयाचा विचार केला जाणार नाही.

११. एम.फिल. नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची हजेरी ठेवणे बंधनकारक आहे. तसेच कोणत्याही प्रकारे सेवेत असलेल्या उमेदवारास प्रवेश दिला गेल्यास त्या विद्यार्थ्याने संबंधित संकुलामध्ये अथवा केंद्रामध्ये पूर्णवेळ नियमित उपस्थित राहून अभ्यासक्रम पुर्ण केला पाहिजे, अन्यथा अशाप्रकारे दिलेले प्रवेश मान्य केले जाणार नाहीत. आणि संबंधित विद्यार्थ्यांच्या सेवेचा कार्यकाल व अभ्यासक्रमाची वेळ याचा ताळमेळ बसला नाही वा अन्य कोणतीही तक्रार निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संकुलप्रमुख/केंद्रप्रमुख (प्राचार्य) यांची राहील. त्यांचेवर विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली जाईल.

१२. नियमित अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेनंतर प्रत्यक्ष प्रवेश देताना शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे मागासवर्गीयांचे आरक्षण पाळणे बंधनकारक आहे व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संकुलप्रमुख व केंद्रप्रमुख (प्राचार्य) यांच्यावर राहील.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ : SUS/BCUD/PGBUTR/2016/ 7797
दिनांक : 11 AUG 2016

**प्रत:**१. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२. मा. संचालक/अधिविभागप्रमुख, सर्व संकुल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

३. मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

४. प्रकाशन विभाग, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.